# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २७/०४/२०२४ (शनिवार) दुपार

## पोलीस स्टेशन कुही हद्दीत रेती तस्करावर कुही पोलीसांची धडक कारवाई

दिनांक २६/०४/२०२४ रोजी पोस्टे. कुही हद्दीतील कुही आकोली शिवारात अवैध्य वाहतुक होत असल्याची गोपनिय माहीती कुही पोलीसांना मिळाल्याने दिनांक २६/०४/२०२४ रोजी पोलीस स्टेशन कुही येथिल अधिकारी व स्टाफसह वरिष्ठांना माहीती देवुन मा. दिपक अग्रवाल सा. भापोसे सहा. पोलीस अधिक्षक तथा ठाणे प्रभारी यांचे नेतृत्वात सदर ठिकाणी जावुन पेट्रोलींग केली असता आकोली शिवारात रोडवर अवदुत पॉलटेक्नीक कॉलेज जवळ ट्रॅक्टर वाहन क्र. MH 40 CH 7334 ट्रॉली क्र. MH 31 AG 6458 या वाहनामध्ये अवैध्यरित्या विनापरवाना रेती भरून वाहतुक करतांना मिळुन आल्याने सदर वाहन **चालक नामे – स्वप्नील गोपीचंद धांडे, रा. आकोली व ट्रॅक्टर मालक वृषभ परमानंद दंडारे रा. कुही** यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आले. सदरचा कार्यवाहीमध्ये ट्रॅक्टर व टॉलीसह किंमत ५,००,०००/– रू. एक ब्रॉस रेती ४०००/–रू. असा एकुण ५,०४,०००/– रू. चा मुद्देमाल जप्त करूण तपास पोउपनि स्वप्नील गोपाले हे करीत आहे.

कार्यवाही पथक मा. पोलीस अधिक्षक हर्ष पोद्दार भापोसे तसेच मा. अपर पोलीस अधिक्षक रमेश धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी ठाणेदार दिपक अग्रवाल सा. भापोसे सहा. पोलीस अधिक्षक पोस्टे कुही पोशी हिवराज लांजेवार, गणेश बोरूले, अर्जुन नाकतोडे, भुमेश्वर भांडारकर यांनी यशस्वीपणे पुर्ण केलेली आहे.



# अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीस अटक

## नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

दिनांक २६/०४/२०२४ रोजीचे ११.४० वा. ते १२.२० वा. दरम्यान पो.स्टे. देवलापार येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना मौजा पवनी शिवार एन एच– ४४ रोड चिधाई माता मंदीर जवळ १२ चक्का टिप्पर क्र. एम एच ४०/बी एफ ५९५८ हा येतांना दिसला. त्याला थांबवून पाहणी केली असता त्यामध्ये चालक **आरोपी नामे बलवंत शिवप्रसाद सिंग, वय ४० वर्ष रा. तुकाराम नगर कन्हान** हा त्याचा ताब्यातील १२ चक्का टिप्पर क्र. एम एच– ४०/बी एफ ५९५८ मध्ये अंदाजे १० ब्रास रेती वाहतूक करतांना मिळून आल्याने सदर टिप्पर चालकास टिप्पर मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता त्याने रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपीकडुन १२ चक्का टिप्पर क्र. एम एच ४०/बी एफ– ५९५८ किंमती २०,००,०००/–रू. व अंदाजे १० ब्रास रेती किंमती ३०,०००/– अशा एकुण २०,३०,०००/– रू मुददेमाल जप्त करून सदर टिप्पर चालक **आरोपी नामे १) बलंवत शिवप्रसाद सिंग, वय ४० वर्ष, रा. तुकाराम नगर कन्हान व मालक नामे– २) मोहीत मुसाफिर यादव, वय २४ वर्ष, रा. रामनगर कन्हान** यांचेविरुद्ध कलम ३७९, १०९ भा. द. वी. सहकलम ४८(७), ४८(८) महा. ज. म. स. सहकलम ४, २१ खाणी आणि खनिजे अधी. १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये पो. स्टे. देवलापार येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे देवलापार येथील ठाणेदार सपोनि राजेश पाटील, पोहवा राहुल रंगारी, पोना प्रमोद मडावी, पोशि मनिश चौकसे यांनी केली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर